दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४७५ वा • शनिवार, ता. २० डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

# मुंबईत भाजप 'मोटा भाई'

## भाजप १५०, शिंदेसेनेला ५० जागांचा प्रस्ताव

**मुंबई । रयत समाचार**

मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने मोठी तयारी सुरू केली असून, एकूण २२७ प्रभागांपैकी १५० जागा लढवण्याचा प्रस्ताव भाजपने तयार केला आहे. मुंबई महापालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. भाजपच्या प्रस्तावानुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ५० जागा देण्याची तयारी असून, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस युतीत सहभागी झाल्यास



त्यांना २७ जागा देण्याचा विचार आहे. याबाबत मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम आणि शिंदेसेनेचे नेते उदय सामंत यांच्यात जागावाटपावर चर्चा झाली. भाजप १५० जागा लढवण्यावर ठाम असून उर्वरित जागांबाबत लवकरच तोडगा निघेल, असा विश्वास अमित साटम यांनी व्यक्त केला. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप १५० पेक्षा अधिक जागा लढवण्याचाही विचार करत आहे.

मागील महापालिका निवडणुकीत भाजपला बंडखोरीमुळे अनेक जागा गमवाव्या लागल्या होत्या, असा तर्क भाजपकडून मांडण्यात आला आहे. दरम्यान, भाजपच्या ५० जागांच्या प्रस्तावामुळे शिंदेसेनेत नाराजी असल्याची चर्चा आहे. शिवसेनेकडून किमान ७० जागांची मागणी करण्यात येत असल्याचे समजते. विधानसभा निवडणुकीतील निकालानंतर महायुतीतील भाजपचे वाढलेले प्राबल्य लक्षात घेता, मुंबई महापालिकेत आपले स्थान टिकवण्यासाठी शिंदेसेना सावध भूमिका घेत असल्याचे चित्र आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील जागावाटपावर पुढील काही दिवसांत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.



# दृष्टिबाधित खेळाडूंना राज्य सरकार सर्वतोपरी मदत करणार- मुख्यमंत्री

**मुंबई । रयत समाचार**

भारताच्या दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट संघाने जागतिक पातळीवर ऐतिहासिक कामगिरी करत विश्वविजेतेपद पटकावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संघातील खेळाडूंचा गौरव करण्यात आला. वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी खेळाडूंशी संवाद साधत राज्य सरकार त्यांच्या सराव, रोजगार, आर्थिक मदत व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासन दिले. मुख्यमंत्री म्हणाले की, संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघ अपराजित राहून अंतिम सामन्यात निर्णायक विजय मिळवला. या संघाने तिरंग्याचा सन्मान वाढवला असून दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेटमधील पहिला विश्वविजेता म्हणून भारताचे नाव इतिहासात नोंदले गेले आहे. या यशामागे खेळाडूंचे अपार कष्ट, जिद्द आणि सातत्यपूर्ण सराव आहे. प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानता त्यांनी 'कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती' हे प्रत्यक्षात सिद्ध केले. संघाच्या अडचणी लक्षात घेऊन कायमस्वरूपी सराव मैदान, सुविधा आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा आयुक्तांमार्फत कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, संघाची कर्णधार दीपिका टी. सी., उपकर्णधार गंगा कदम, क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाईंड इन इंडियाचे चेअरमन के. जी. महंतेश यांच्यासह संघातील खेळाडू उपस्थित होते.

# मनरेगा आणि युजीसीवर केंद्राची कुऱ्हाड




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना एका आर्थिक वर्षात १०० दिवसांच्या अकुशल रोजगाराची हमी देते. ज्यामुळे ग्रामीण भागातील गरिबी आणि बेरोजगारी कमी होण्यास मदत होते. ही योजना काम मागणाऱ्यांना १५ दिवसांत काम देते आणि वेतन थेट बँक खात्यात जमा करते, पण आता केंद्र सरकार या योजनेचे नाव विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) २०२५ असे बदलणार आहे. शिवाय महात्मा गांधी ऐवजी पूज्य बापू असा गोलमाल शब्द वापरला जाणार आहे. केंद्र सरकारला पूज्य असणारे बापू गांधी आहेत की आसाराम बापू हे कळायला तज्ज्ञांची गरज नाही. हे बापू नक्की कोण, याचीच सध्या चर्चा आहे. पण प्रत्यक्षात मनरेगा योजना कशी मोडीत काढली जाणार, याबाबतीत मात्र बोलले जात नाही. भारतातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्ती, जी अकुशल हाताने काम करण्यास तयार आहे, तिला एका वर्षात किमान १०० दिवसांच्या रोजगाराची कायदेशीर हमी ही योजना देते. कामाचा अधिकार देणारी ही जगातील एकमेव योजना आहे.१८ वर्षांवरील कोणताही भारतीय नागरिक अर्ज करू शकतो, जो ग्रामीण भागात राहतो.अर्ज केल्यापासून १५ दिवसांच्या आत रोजगार मिळणे बंधनकारक आहे.



**प्रभाकर ढगे**
९३७३०२१५८४
समुह संपादक,
रयत समाचार, गोवा.

**प्रासंगिक**

मजुरी थेट अर्जदाराच्या बँक किंवा पोस्ट ऑफिस खात्यात जमा केली जाते.नोंदणीकृत कुटुंबाला जॉब कार्ड मिळते, जे कामाच्या हक्काचा पुरावा आहे. पाणी संवर्धन, वृक्षारोपण, जमीन सुधारणा यांसारखी कामे केली जातात. मोदी सरकारने मनरेगाचे केवळ नामांतरच केलेले नाही तर या योजनेला पध्दतशीरपणे संपविण्याचा अघोरी डाव रचला आहे. एकीकडे या देशातील शेवटच्या माणसाला जगविणारी मनरेगा संपवायची आणि दुसरीकडे शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च बुध्दिमत्तेला वाव देणारी विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) ही व्यवस्था देखील मारून टाकायला सुरुवात केली आहे. जगातील एकमेव योजना जिथे नागरिकांना वर्षात १०० दिवस काम मागण्याचा अधिकार होता. आता मोदी सरकारने काम कधी आणि कुठे सुरू करायचे हे ठरवण्याचा अधिकार स्वतःकडे घेतला आहे. या योजनेचे नाव बदलताना वरवर दाखवण्यासाठी, १०० दिवस १२५ पर्यंत वाढवण्यात आले आहेत. परंतु केंद्र सरकारचा निधी ९०% वरून ६०% पर्यंत कमी करण्यात आला आहे. आर्थिक संकटामुळे देशातील राज्ये आधीच वैतागलेली आहेत. समजा राजस्थान दरवर्षी १०,००० कोटी रुपयांचे काम करत असे, परंतु आता राजस्थानला ४,००० कोटी रुपये मनरेगामध्ये गुंतवावे लागतील. आधीच निधीची चणचण असलेली राज्ये मनरेगाला कुठून पैसा देणार? तात्पर्य निधीअभावी राज्ये मनरेगा काम सुरू करणार नाहीत. म्हणजे १२५ दिवस विसरून जा, आता २५ दिवसांचे कामही शक्य होणार नाही. कामगार संघटनांचे नेते या बदलावर सडकून टीका करत आहेत. मनरेगाचे नवे बदल प्रत्यक्षात, हे मोठ्या शेतकऱ्यांना स्वस्त मजूर आणि मोठ्या भांडवलदारांना स्वस्त मजूर पुरवण्याचे षड्यंत्र आहे, असा सरकावर आरोप केला जात आहे. अर्थात विरोधकांच्या आरोपाला उत्तर देण्यासाठी केंद्र सरकारकडे वेळ आणि इच्छाही नाही. मनरेगामुळे, कामगार कमी पैशात काम करण्यास तयार नव्हते. पण आता बेरोजगार बनलेल्या मजुरांना स्वस्त वेतनावर काम करावे लागेल, हा मोदी सरकारचा खरा हेतू आहे. मोदी सरकारने केलेली दुसरी गोष्ट म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग यूजीसी रद्द करून त्या जागी विकसित भारत शिक्षा प्रतिष्ठान नावाचा एक नवीन विभाग तयार केला आहे. पुरोगामी लोकशाही आघाडी सरकारच्या तथा काँग्रेस राजवटीतील योजनांची केवळ नावे बदलायची आणि त्या योजना कथित हिंदू राष्ट्राच्या साच्यात बसविण्यासाठी कामगार, शेतमजूर, शेतकरी आणि मध्यम वर्गाला मूर्खात काढायचे, असा हा कार्यक्रम आहे. मोदी सरकारचा हा नवीन विभाग विद्यापीठांना निधी देऊ शकणार नाही. कारण मोदी सरकारने उच्च शिक्षण मंत्रालयाला निधी पुरवण्याचे अधिकार दिले आहेत. म्हणून आता विद्यापीठांना विद्यार्थ्यांना बँकांकडून कर्ज घेऊन पुढे शिक्षण घेण्यास सांगण्यास सांगितले जाईल. या नव्या व्यवस्थेमुळे दलित, आदिवासी, ओबीसी, गरीब आणि अल्पसंख्याक समुदायातील तरुणांना उच्च शिक्षण घेता येणार नाही.

ते देखील भांडवलदारांसाठी स्वस्त मजूर बनतील. मुळात हा वर्ग शिकू नये, हीच एकचालकानुवर्ती इच्छा असल्यामुळे हा सगळा बनाव रचला जात आहे. हिंदू राष्ट्रात केवळ अब्दुललाच टाईट करण्याचा कार्यक्रम नाही. चातुर्वण्य व्यवस्थेत दुय्यम तिय्यम दर्जाचे नागरिक असलेल्या दलित, आदिवासी, ओबीसी समुदायातील बहुसंख्य जणांना मनुस्मृतीच्या काळात घेऊन जाण्याची वैदिक चलाखी आहे. दिल्लीचा मेंदू सध्या रेशीमबाग नियंत्रित करते आहे. त्याचाच हा परिपाक आहे. बाकी आपण विश्वगुरू होण्याच्या स्वप्नात गुंग राहू. मनरेगा आणि युजीसीनंतर कुठली व्यवस्था मोडीत काढली जाते, त्याची फक्त प्रतिक्षा करू.

# ९३ वर्षांत इतिहास घडविणारी लेक

## सई जाधव इंडियन मिल्ट्री ॲकॅडमीमधील पहिल्या महिला अधिकारी

**कोल्हापूर । रयत समाचार**

भारतीय लष्कराच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा क्षण २ जानेवारी २०२६ रोजी घडणार आहे. कोल्हापूरच्या कन्या सई जाधव या इंडियन मिल्ट्री अकॅडमी (आयएमए), डेहराडून येथून प्रशिक्षण पूर्ण करून लेफ्टनंट म्हणून नियुक्त होणार आहेत. विशेष बाब म्हणजे, आयएमएच्या ९३ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एका महिला अधिकाऱ्याची नियुक्ती होणार आहे. आजवर केवळ पुरुष अधिकाऱ्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या आयएमएमध्ये सई जाधव यांनी कोणतीही सवलत न घेता, पुरुष अधिकाऱ्यांप्रमाणेच कठोर प्रशिक्षण, तेच नियम, तोच गणवेश आणि तोच सन्मान मिळवत हा इतिहास घडवला आहे.

शारीरिक कसोटी, मानसिक ताणतणाव, रणनिती, शस्त्रप्रशिक्षण, नेतृत्वगुण प्रत्येक कसोटीत सई जाधव यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली. स्वप्नापासून सन्मानापर्यंतचा प्रवास लहानपणापासूनच देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या सई जाधव यांनी शिक्षणासोबतच शिस्त, फिटनेस आणि स्पर्धात्मक तयारी यावर भर दिला. कुटुंबियांचा भक्कम पाठिंबा, कठोर परिश्रम आणि अढळ आत्मविश्वास यांच्या बळावर त्यांनी अशक्य वाटणारा टप्पा गाठला. महिलांसाठी




नवी वाट सई जाधव यांची ही कामगिरी केवळ वैयक्तिक यश नसून, भारतीय लष्करामधील लैंगिक समानतेकडे टाकलेले ऐतिहासिक पाऊल आहे. यापुढे आयएमएचे दरवाजे महिलांसाठी अधिक खुले होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. देशभरातील हजारो मुलींसाठी ही कहाणी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरणार आहे. कोल्हापूरचा अभिमान, देशाचा सन्मान सई जाधव यांच्या यशामुळे कोल्हापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि संरक्षण क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ना सवलत, ना वेगळे नियम. तीच मेहनत, तोच गणवेश, तोच सन्मान! २ जानेवारी २०२६ रोजी लेफ्टनंट सई जाधव भारतीय लष्कराच्या परंपरेत नवा अध्याय लिहिणार आहेत. ही कहाणी प्रत्येक लेकीपर्यंत पोहोचलीच पाहिजे.

## मंत्री कोकाटेंना दिलासा अर्धवटच

# शिक्षेला स्थगिती नाही, मात्र एक लाखांचा जामीन मंजूर

**मुंबई । रयत समाचार**

माजी मंत्री व आमदार माणिकराव कोकाटे यांना नाशिकच्या न्यायालयाने सुनावलेल्या दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. मात्र, एक लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर त्यांना जामीन मंजूर करण्यात आल्याने त्यांची तात्काळ तुरुंगवारी टळली आहे. तथापी, शिक्षा कायम राहिल्यामुळे कोकाटे यांची आमदारकी आता धोक्यात आली असून, याबाबत अंतिम निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे असणार आहे. अल्पउत्पन्न दाखवून सरकारी कोट्यातील सदनिका




मिळवल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे आणि बंधू विजय कोकाटे यांना नाशिकच्या न्यायालयाने दोषी ठरवत दोन वर्षांची शिक्षा सुनावली. या निर्णयाविरोधात कोकाटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती लड्ढा यांच्या समोर या प्रकरणावर सुनावणी झाली. कोकाटे यांच्या वतीने ॲड. अनिकेत उज्ज्वल निकम आणि ॲड. रवींद्र कदम यांनी बाजू मांडली. तसेच या प्रकरणात तीन हस्तक्षेप याचिकाही दाखल करण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये शिक्षेला स्थगिती देण्यास तीव्र विरोध करण्यात आला. सुनावणीदरम्यान न्यायालयाने सरकारी वकिलांना शिक्षेला स्थगिती देण्याबाबत भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले. सुरुवातीला केवळ वस्तुस्थिती मांडण्यास सांगितल्याचे सरकारी वकिलांनी नमूद केले. मात्र, नंतर न्यायालयाने पुन्हा स्पष्ट विचारणा केल्यानंतर सरकारी वकिलांनी शिक्षेला स्थगिती देण्यास सरकारचा विरोध असल्याचे ठामपणे न्यायालयास सांगितले. दरम्यान, याचिकेच्या अंतिम सुनावणीपर्यंत माणिकराव कोकाटे हे जामिनावर बाहेर राहणार आहेत. मात्र, शिक्षेला स्थगिती न मिळाल्याने त्यांचे राजकीय भवितव्य आणि आमदारकीवर टांगती तलवार कायम आहे.

## बी.के. मॉडेल हायस्कूल शताब्दी महोत्सव

# खा. तेजस्वी सूर्या, अभिनेते दीपक करंजीकर आज बेळगावात

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बेळगाव एज्युकेशन सोसायटीच्या बी.के. मॉडेल हायस्कूलच्या देदीप्यमान शताब्दी महोत्सवाचा मुख्य सोहळा आज, शनिवार दि. २० डिसेंबर रोजी अत्यंत उत्साहात पार पडणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी देशाचे युवा नेतृत्व आणि बंगळूर दक्षिणचे खासदार तेजस्वी सूर्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. खासदार तेजस्वी सूर्या हे भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष असून संसदेतील अभ्यासू आणि प्रभावी वक्ता म्हणून त्यांची ओळख आहे. अत्यंत तरुण वयात संसदेत प्रवेश करून त्यांनी तंत्रज्ञान, स्टार्टअप्स, डिजिटल क्रांती तसेच राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भातील मुद्द्यांवर आपल्या परखड भूमिकेमुळे देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे शताब्दी महोत्सवाचा उत्साह अधिकच वाढणार आहे. या कार्यक्रमास मराठी चित्रपट व नाट्यसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते दीपक करंजीकर यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे. अनेक गाजलेल्या मराठी मालिका व चित्रपटांतील त्यांच्या सशक्त अभिनयामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या



मनावर अधिराज्य गाजवले आहे. कलाकार म्हणूनच नव्हे, तर अर्थशास्त्र व सामाजिक विषयांचे अभ्यासक म्हणूनही त्यांची ओळख आहे. या शताब्दी महोत्सवाला राज्यसभा सदस्य ईराण्णा कडाडी, बेळगाव दक्षिणचे आमदार अभय पाटील, के.एल.ई. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रभाकर कोरे, माजी आमदार महांतेश कवटगीमठ, माजी आमदार संजय पाटील, माजी आमदार अनिल बेनके, ख्यातनाम उद्योजिका व शाळेच्या माजी विद्यार्थिनी विद्या मुरकुंबी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शताब्दी महोत्सवानिमित्त आज सकाळी ७.३० वाजता बेळगाव एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांमधील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची भव्य प्रभात फेरी काढण्यात येणार आहे. सायंकाळी ५.३० वाजता शाळेच्या आवारात उभारलेल्या भव्य मंडपात मुख्य कार्यक्रमास सुरुवात होणार आहे.

# २० ते २२ रोजी मुंबईत तीन दिवसीय राज्यव्यापी स्त्री परिषद

## स्त्री हक्कांच्या नव्या पर्वाची सुरुवात; समानतेचा निर्धार

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेला ५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर येत्या २०, २१ आणि २२ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे तीन दिवसीय राज्यव्यापी स्त्री परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत गेल्या पाच दशकांतील स्त्री चळवळीचा सखोल आढावा घेण्यात येणार असून, पुढील ५० वर्षांच्या स्त्रीवादी संघर्षाची दिशा निश्चित केली जाणार आहे. ही परिषद केवळ वर्धापन दिनाचा उत्सव नसून, सध्याच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक वास्तवाचे भान ठेवत नव्या पिढीला संघर्षासाठी सज्ज करण्याचा ठाम निर्धार असल्याचे महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. या परिषदेसाठी अत्यंत लोकशाही पद्धतीने सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली असून, तिची पहिली बैठक ११ जानेवारी २०२५ रोजी पार पडली. राज्यभरातील सुमारे ७० महिला संघटना या प्रक्रियेत सहभागी आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्हे, तालुके आणि सामाजिक घटकांचे व्यापक प्रतिनिधित्व या परिषदेत दिसून येणार आहे. ग्रामीण, दलित, आदिवासी, कष्टकरी महिला, अल्पसंख्यांक तसेच ट्रान्सजेंडर समुदायांचे प्रश्न समजून घेणे, त्यांचे नेतृत्व घडवणे आणि स्त्री चळवळीचा पाया अधिक भक्कम करणे, हा परिषदेचा केंद्रबिंदू असल्याचे




परिषदेच्या सचिव ॲड. निशा शिवूरकर यांनी सांगितले. सध्याच्या सामाजिक वातावरणाबाबत परिषदेत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. समाजात वाढत चाललेली आक्रमकता, हिंसा आणि द्वेष यांना मिळणारे अप्रत्यक्ष प्रोत्साहन तसेच स्त्रियांच्या हक्कांवर होत असलेले हल्ले याविरोधात ठाम भूमिका घेण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. महिला आयोगासारख्या घटनात्मक संस्थांची स्वायत्तता कमी होणे, कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी न होणे, महिला बजेट तसेच संशोधन प्रक्रियेत स्त्री संघटनांचा अपुरा सहभाग या मुद्द्यांवर परिषदेत स्पष्ट आणि चिकित्सक चर्चा होणार आहे. कायदे अस्तित्वात असतानाही अंमलबजावणीत दिसून येणारी पुरुषप्रधान मानसिकता, असंवेदनशील प्रशासकीय यंत्रणा आणि न्यायप्रक्रियेतील विलंब यावरही सखोल विचारमंथन केले जाणार आहे. परिषदेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मंचावर सावित्रीबाई फुले, त्यांच्या सहकारी फातिमा शेख आणि हिंदू धर्माचा त्याग करून ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या पंडिता रमाबाई यांच्या प्रतिमा लावण्यात येणार आहेत. यामागे सर्व धर्मांतील स्त्रियांना एकत्र आणण्याचा आणि स्त्री चळवळीच्या सर्वसमावेशक व परिवर्तनवादी परंपरेचा ठाम संदेश देण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. परिषदेच्या पहिल्या दिवशी घरगुती हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, वैवाहिक व कौटुंबिक हिंसाचार, जातीय व सांप्रदायिक हिंसाचार तसेच भारतीय संविधानासमोरील सध्याची आव्हाने यांवर गटचर्चा आणि परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहेत. दुसऱ्या दिवशी आर्थिक व राजकीय सद्यस्थिती, सार्वजनिक वाहतूक, पर्यावरण व विकास, नवीन कामगार कायदे, केअर वर्क तसेच ट्रान्स आणि इंटरसेक्स समुदायांचे प्रश्न यांवर तज्ज्ञ आपले विचार मांडणार आहेत. यासोबतच नाटक, माहितीपट आणि नृत्यनाट्य अशा सांस्कृतिक कार्यक्रमांची प्रभावी मांडणीही करण्यात आली आहे. परिषदेच्या तिसऱ्या आणि शेवटच्या दिवशी, २२ डिसेंबर २०२५ रोजी, यशवंतराव चव्हाण सेंटरवरून आझाद मैदानापर्यंत कूच काढण्यात येणार असून, त्यानंतर महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेची जाहीर सभा होणार आहे. या सभेत विविध समुदायांची निवेदने सादर केली जातील. तसेच परिषदेचे ठराव मांडून पुढील संघर्षाची स्पष्ट दिशा जाहीर केली जाणार आहे. या तीन दिवसीय परिषदेत सुप्रिया सुळे, ॲड.इंदिरा जयसिंग, डॉ.सईदा हमीद आणि कुमार केतकर यांच्यासह अनेक ज्येष्ठ विचारवंत, अभ्यासक व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. तसेच तिस्ता सेटलवाड, ॲड. वृंदा ग्रोवर यांसारखे कायदेविषयक तज्ज्ञही परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेला शारदा साठे (अध्यक्ष), डॉ. चयनिका शाह (उपाध्यक्ष), ॲड.निशा शिवूरकर (सचिव) आणि डॉ.छाया दातार (खजिनदार) यांच्यासह महाराष्ट्रातील विविध महिला संघटना व कार्यकर्त्यांचे नेतृत्व लाभणार आहे. स्त्रियांची प्रगती ही केवळ वैयक्तिक यशापुरती मर्यादित न राहता समूहभावना, समता, विविधता आणि एकजूट यांवर आधारित असली पाहिजे, या ठाम भूमिकेवर परिषद उभी आहे. त्यामुळे ही परिषद आगामी काळातील स्त्रीवादी परिवर्तनासाठी एक सशक्त, प्रभावी आणि दिशादर्शक मंच ठरेल, असा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

# आदिशक्ती महिलांमध्ये नवी क्रांती घडविणारा उपक्रम- जयेश पटेल

## रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटीच्या नूतन पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा उत्साहात

**अहमदनगर । समीर मन्यार**

रोटरी क्लब ही सुमारे १२० वर्षांची जुनी परंपरा लाभलेली जागतिक संघटना असून ही परंपरा जपत दूरदृष्टी ठेवून सर्वांनी काम करणे आवश्यक आहे. रोटरीमध्ये 'मीपणा' नसून संघभावना, स्त्रीपुरुष समानता आणि प्रॅक्टिकल कामाला महत्त्व दिले जाते. रोटरीच्या माध्यमातून महिलांसाठी 'आदिशक्ती' हा नवा उपक्रम राबविण्यात येत असून, या उपक्रमातून महिलांमध्ये नवी क्रांती घडेल, असे प्रतिपादन रोटरी क्लबचे भावी प्रांतपाल जयेश पटेल यांनी केले. रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटीच्या पुढाकारातून 'स्वप्नांचे कृतीत रूपांतर करूया' या संकल्पनेतून पुढील वर्षातील सहाय्यक प्रांतपाल, अध्यक्ष, सचिव व त्यांच्या कार्यकारिणीला दिशा देण्यासाठी नगरपुणे रोडवरील वरद ग्रीन रिसॉर्ट येथे झोन 'ए' अहिल्यानगर अंतर्गत रोटरी क्लबसच्या नवनिर्वाचित अध्यक्ष व सचिवांचे लर्निंग सेमिनार आयोजित करण्यात आले होते. याच कार्यक्रमात 'आदिशक्ती' या महिला सक्षमीकरण उपक्रमाचा शुभारंभ डीजीई जयेश पटेल यांच्या उपस्थितीत करण्यात आला. जयेशभाई पटेल म्हणाले की, 'आदिशक्ती' उपक्रमांतर्गत माझे मन, माझी सुरक्षा, माझे आरोग्य आणि माझी आदिशक्ती या चार प्रमुख घटकांवर काम करण्यात येणार असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी रोटरी प्रभावी भूमिका बजावणार आहे. यावेळी डीजी सुधीर लातूरे, पारुल पटेल, रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटीच्या अध्यक्षा शुभश्री पटनायक, सचिव निखिल कुलकर्णी, संयोजक चंदना शहा गांधी, सहसंयोजक रवी डीक्रूज, प्रियंका चिखले, डीजीएन क्षितिज झावरे, मेंटोर सलाम शेख यांच्यासह राज्यातील विविध रोटरी क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे भावी प्रांतपाल पटेल यांच्या कार्यकाळात पारुल पटेल यांच्या संकल्पनेतून रोटरियन महिला विंगची स्थापना करण्यात आली असून, त्याअंतर्गत महिला सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती' हा नवा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती क्लबच्या अध्यक्षा शुभश्री पटनायक यांनी दिली. यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे गव्हर्नर सुधीर लातूरे म्हणाले की, रोटरीच्या माध्यमातून समाजसेवेची संधी मिळणे हे आपले भाग्य आहे. पुढील वर्षाचे नियोजन करताना आपल्या क्लबबद्दलची जबाबदारी लक्षात घेऊन काम करावे, असे त्यांनी सांगितले. डीजीएन क्षितिज झावरे यांनी 'लीडरशिप' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच 'आदिशक्ती' उपक्रमातील सर्व महिला सदस्यांचे क्लबच्या वतीने स्वागत करून त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन चंदना शहा गांधी यांनी केले, तर आभार सचिव निखिल कुलकर्णी यांनी मानले.



# आनंदधाम येथे रविवारी आत्मध्यान शिबिर

## नागरीकांना सहभागी होण्याचे आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**

मानव जीवनात वाढत चाललेला ताणतणाव, अस्वस्थता, नैराश्य व मानसिक अशांतता दूर करून अंतःकरणात शांती, संयम व सकारात्मकतेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक ध्यान दिनानिमित्त शहरातील आनंदधाम येथे रविवार, ता. २१ डिसेंबर रोजी आत्मध्यान लाईव्ह शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सर्व नागरिक व साधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन वर्धमान स्था. जैन श्रावक संघाच्या वतीने करण्यात आले.

हे शिबिर रविवारी सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० या वेळेत ध्यान गुरु आचार्य सम्राट परमपूज्य डॉ. शिवमुनी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. या वेळी जैन धर्मातील प्रख्यात संत-महात्मे तसेच साधु-साध्वीवृंदांचे पावन सान्निध्य लाभणार आहे. या पवित्र कार्यक्रमास युवाचार्य प्रवर पूज्य महेंद्रऋषी म.सा., महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषी म.सा., प्रबुद्ध विचारवंत पूज्य आदर्श ऋषी म.सा. तसेच श्रमण संघीय सल्लागार पूज्य तारकऋषी म.सा. यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

त्यांच्या प्रेरणादायी विचारांमधून ध्यान, आत्मशुद्धी, संयम, अहिंसा व जीवनातील संतुलन यावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत माणूस बाह्य प्रगतीकडे धाव घेत असताना अंतर्गत शांती हरवत चालली आहे. अशा परिस्थितीत ध्यान ही केवळ साधना न राहता जीवन जगण्याची एक कला बनली आहे. या शिबिरात सामूहिक ध्यान सत्राच्या माध्यमातून सहभागी साधकांना मानसिक स्थैर्य, आत्मिक उन्नती, सकारात्मक विचारशक्ती व अंतर्मनातील शांतीचा अनुभव घेता येणार आहे. तसेच ध्यानासोबत योगाचेही धडे दिले जाणार असून या अभ्यासातून आरोग्य, एकाग्रता व जीवनातील निर्णयक्षमता कशी वृद्धिंगत होते, याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. या ध्यान महोत्सवात विविध स्तरांतील नागरिक, युवक, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# निवडणुकीसाठी मनसे सज्ज; ३५ उमेदवारांच्या मुलाखती

**अहमदनगर । राजू खरपुडे**

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मोठ्या ताकदीने उतरण्याचा निर्धार केला असून, त्या अनुषंगाने मनसेच्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखत प्रक्रियेत ३५ इच्छुक उमेदवारांनी सहभाग नोंदविला. संघटनात्मक ताकद, स्थानिक प्रश्नांची जाण, जनसंपर्क तसेच पक्षनिष्ठा या निकषांवर उमेदवारांची चाचपणी करण्यात आली. या वेळी जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, विद्यार्थी सेनेचे उपाध्यक्ष सुमित वर्मा, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष मनोज राऊत, आरती उफाडे, शहर उपाध्यक्ष संदीप चौधरी, संकेत व्यवहारे, तुषार हिरवे, विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रविण गायकवाड तसेच अंबरनाथ भालसिंग आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर यांनी मनसेची आगामी निवडणूक रणनीती स्पष्ट करत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, महानगरपालिकेतील भ्रष्टाचार, ढिसाळ प्रशासन आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे होत असलेले दुर्लक्ष आता सहन केले जाणार नाही. मनसे नगर शहरात सक्षम, प्रामाणिक आणि जनतेशी थेट जोडलेले उमेदवार देणार असून ही निवडणूक जनतेच्या प्रश्नांवर लढवली जाणार आहे. शहराचा सर्वांगीण विकास, पारदर्शक कारभार आणि नागरिकांना न्याय देणारे प्रशासन हे मनसेचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. एकूणच, या मुलाखतींच्या माध्यमातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तयारीला वेग दिला असून नगर शहरात मनसे निर्णायक ताकद म्हणून उभी राहत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# आनंद पार्श्व गुरुकुलचे चौथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**केडगाव । पंकज गुंदेचा**

येथील प्रख्यात आनंद नवकार परिवार ट्रस्ट संचालित श्री आनंद पार्श्व गुरुकुल शाळेचे चौथे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषिजी म.सा., महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. तसेच संस्कार दिवाकर पूज्य आलोकऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वाद व प्रेरणेमुळे हा कार्यक्रम यशस्वी ठरला. गुरुकुल परंपरेतील आधुनिक शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी प्रदर्शन करत उपस्थितांची मने जिंकली.

'शिक्षा, सेवा, संस्कार आणि संस्कृती'चा सुंदर आविष्कार विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून दाखवून दिला. यावर्षीच्या स्नेहसंमेलनाची संकल्पना 'संस्कार आणि आध्यात्मिक महत्त्व' अशी असून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय मूल्ये व परंपरांची रुजवण करण्यावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पूज्य संत व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने तसेच विद्यार्थ्यांच्या सामूहिक नवकार



मंत्र व गणेश वंदनेने झाली. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक वेशभूषांमध्ये नृत्य, गायन व नाट्यकलेचे सादरीकरण केले. लोकनृत्ये, देशभक्तीपर गीते तसेच नैतिक मूल्यांवर आधारित लघुनाट्यांमधून जीवनातील मूल्ये व ध्येयाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. या कार्यक्रमास ट्रस्टचे कार्याध्यक्ष डॉ. अशोककुमार पगारिया, आनंद भंडारी (I.A.S.) , सुप्रसिद्ध उद्योजक आनंदराज मुनोत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तसेच निर्मला बाफना, मेघा बोरा, इच्छाबाई बोरा, लताबाई बोरा, सुप्रिया छल्लानी, सुशीला बाफना, मोहन बरमेचा, राजकुमार लूनिया, मनोज बाफना, मनोज शेटिया, राजेंद्र बोरा, मधुबाला चोरडिया, आनंद चोपड़ा आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध व गुणवत्तापूर्ण सादरीकरणाचे विशेष कौतुक केले.

आजच्या डिजिटल युगात गुरुकुल परंपरेशी जोडून ठेवणारे श्री आनंद पार्श्व गुरुकुलचे कार्य अत्यंत स्तुत्य असल्याचे त्यांनी नमूद केले. शैक्षणिक वर्षभरात विविध स्पर्धा व अभ्यासात विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. शाळेच्या प्राचार्या कादंबरी सूर्यवंशी यांनी मागील वर्षाचा प्रगती अहवाल सादर करून आगामी उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवृंदांचे सहकार्य लाभले. समन्वयक मेघा बोरा यांनी विशेष परिश्रम घेतले. पालकांच्या सहकार्यामुळे हा समारंभ अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचा समारोप मनोज शेटिया यांनी आभारप्रदर्शन व पसायदानाने केला.


दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे

ख्रिसमस विशेषांक

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात

अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780

संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800

रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
✲ अधिक माहितीसाठी संपर्क ✲
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# समाजहिताच्या उपक्रमांनी पवार यांचा वाढदिवस साजरा

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचा पुढाकार

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, लोकनेते पद्मभूषण खासदार शरदचंद्र पवार यांचा ८५ वा वाढदिवस महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रक्तदान शिबिर, आधार कार्ड अपडेट, रांगोळी व पाककला स्पर्धा तसेच कबड्डी व बॅडमिंटन स्पर्धा अशा विविध सामाजिक व क्रीडा उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. उद्घाटन समारंभप्रसंगी माजी मंत्री व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष बबनराव पाचपुते अध्यक्षस्थानी उपस्थित होते. यावेळी ते म्हणाले की, शरदचंद्र पवार हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाच्या राजकारणातील एक मोठे नाव आहे. युवकांनी जीवनात कष्ट करून मोठे व्हावे, मन, मनगट आणि मेंदू मजबूत ठेवावा, असे मार्गदर्शन करून त्यांनी शरदचंद्र पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषदेचे माजी



अध्यक्ष बाबासाहेब भोस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी शरदचंद्र पवार हे भारतीय राजकारणातील अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्त्व असून कृषी, सहकार, शिक्षण, राजकारणासोबतच क्रीडा क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगत शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य प्रा. डॉ. महादेव जरे यांनी केले. त्यांनीही शरदचंद्र पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी मा. नवनाथ बोडखे, प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे यांनीही शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद लाभला. डॉ. किरण ढवळे, प्रा. भाऊ बुलाखे, प्रा. देवेंद्र बहिरम, डॉ. हरिभाऊ वाघीरे, प्रा. संजय फटे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. या शिबिरात ३२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. आधार कार्ड अपडेट उपक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. सुदाम भुजबळ यांनी काम पाहिले. रांगोळी स्पर्धेचे समन्वयक डॉ. सुप्रिया पवार होत्या. पाककला स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ. अनुराधा ताटे यांनी जबाबदारी पार पाडली. श्रीगोंदा तालुका रयत संकुल अंतर्गत भव्य कबड्डी व बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रांगणात व इनडोअर स्टेडियममध्ये करण्यात आले. या स्पर्धांनाही उदंड प्रतिसाद लाभला. शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. कल्पना बागूल व क्रीडा शिक्षक प्रा. संजय डफड यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. वक्तृत्व स्पर्धेचे समन्वयक प्रा. डॉ. राजाराम कानडे होते. सूत्रसंचालन प्रा. उषा बोरुडे, प्रा. सोनाली रायकर व प्रा. संदीप दरेकर यांनी केले, तर आभार पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांनी मानले. या समारंभास उपप्राचार्य प्रा. नितीन थोरात, डॉ. राहुल गायकवाड, प्रा. रमेश थोरात यांच्यासह सर्व प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेशन व्यवस्थेत पारदर्शकता; बायोमेट्रिक तपासणी

**बेलापूर । शफीक बागवान**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत दिले जाणारे रेशन केवळ पात्र आणि गरजू कुटुंबांपर्यंतच पोहोचावे, या उद्देशाने अन्न व ग्राहक संरक्षण विभागाने विशेष तपासणी आणि पडताळणी मोहीम हाती घेतली. ३१ डिसेंबर नंतर केवायसी बायोमेट्रिक न केलेल्या कुटुंबांना रेशनवरील धान्य मिळणे बंद होणार आहे. बनावट नावे, अपात्र लाभार्थी आणि चुकीच्या नोंदी या मोहिमेमुळे बाहेर पडणार असून रेशन व्यवस्थेत पारदर्शकता या माध्यमातून आणली जाणार आहे. सरकारच्या निर्देशानुसार, आता रेशन कार्डची पडताळणी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पडताळणी केली जाणार आहे. संशयास्पद, चुकीच्या किंवा नियमबाह्य आढळणाऱ्या नोंदी थेट संगणक प्रणालीतून वगळल्या जाणार आहेत. या प्रक्रियेमुळे रेशन व्यवस्थेतील अनावश्यक भार कमी होऊन अपात्र नावे आपोआप वगळली गेल्याने साठ्याचा गैरवापर थांबणार आहे. ज्या कुटुंबांना खरोखर अन्नधान्याची गरज आहे, त्यांना वेळेवर आणि पूर्ण प्रमाणात रेशन मिळू शकेल. यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक सक्षम आणि विश्वासार्ह निर्माण होणार आहे. रेशनकार्ड धारकांना ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. ज्या लाभार्थ्यांनी अद्याप ई-केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांना भविष्यात रेशन बिना संदर्भात सरकार कडक पावले उचलणार आहेत.

कोणतेही पात्र कुटुंब लाभापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने ग्रामपातळीपासून शहरांपर्यंत या माहितीचा व्यापक प्रसार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ई-केवायसी या डिजिटल पडताळणी तून रेशनकार्डधारकाची ओळख आधारच्या माध्यमातून बायोमेट्रिक पद्धतीने तपासली जाणार आहे. फिंगरप्रिंट किंवा आयरिसस्कॅनद्वारे ही पडताळणी केली जाणार आहे. ई-केवायसी करण्यासाठी लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या रेशन दुकानात जावे लागणार आहे.

कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड आणि रेशनकार्ड सोबत नेणे आवश्यक असून रेशन दुकानदाराकडे उपलब्ध असलेल्या पीओएस मशीनद्वारे बोटांचे ठसे किंवा डोळ्यांचे स्कॅन घेऊन प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

# नगरपालिका निवडणुकीत प्रशासनाची मोलाची कामगिरी




**प्रशासनाचे बहुमोल सहकार्य**

**निवडणुकीच्या दिवशी आमची नियुक्ती पिंक बूथवर करण्यात आली होती. त्या ठिकाणी प्रशासनाकडून सर्व प्रकारचे मोलाचे सहकार्य मिळाले. बाबीसाठी सहाय्यक अधिकारी देण्यात आला होता. सर्व व्यवस्था अत्यंत उत्तम ठेवण्यात आली होती.**

श्रीरामपूर - नऊ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर २ डिसेंबर रोजी मतदानाने संपन्न झालेल्या नगरपालिका निवडणुकीची मतमोजणी उद्या होणार असून, त्यासाठीची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी किरण सावंत पाटील यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मिलिंद कुमार वाघ व या संपूर्ण निवडणुकीत अत्यंत मोलाची भूमिका बजावणारे दुसरे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्या सहकार्याने नगरपालिका निवडणुकीचे अतिशय काटेकोर व नियोजनबद्ध व्यवस्थापन केले. मतदार याद्या प्रसिद्ध करणे, त्यावर सूचना-हरकती मागविणे, याद्या अंतिम करणे, नामनिर्देशन पत्रे स्वीकारणे, आवश्यक त्या ठिकाणी सुनावण्या घेणे, निवडणूक प्रक्रियेतील इतर कामे, मतदान केंद्रांचे नियोजन, तेथील कर्मचाऱ्यांची नियुक्ती, मतदानाच्या दिवशी कोणतीही तक्रार न येता शांततेत व सुरळीत मतदान प्रक्रिया पार पाडणे यासाठी कर्मचाऱ्यांचे योग्य नियोजन करून जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. मतदानानंतर मतपेट्या सुरक्षित ठेवणे, तसेच अचानक मतमोजणी पुढे ढकलली गेल्याने निर्माण झालेल्या ताणाच्या परिस्थितीत स्ट्राँग रूम व त्याची सुरक्षा व्यवस्था अत्यंत चोख ठेवण्यात निवडणूक यंत्रणेने महत्त्वाची भूमिका बजावली. मतदानाच्या दिवशी जवळपास एक हजार कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुकीचे कामकाज पार पाडण्यात आले. मतदान केंद्रांवर कोणत्याही प्रकारची तक्रार येऊ नये, मतदान अधिकाऱ्यांना काम करताना अडचणी येऊ नयेत, यासाठी त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करताना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात आल्या. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना कुठलाही त्रास होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेत उत्तम नियोजन केले. निवडणूक यंत्रणा सक्षम व निष्णात असल्यास सर्व कामकाज सुरळीत पार पडते, या अनुभवातून प्रत्येक बुथवर सक्षम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. कर्मचाऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी गाद्यांची सोय, नाश्ता व जेवणाची व्यवस्था करण्यात आली. साधारणपणे निवडणुकीच्या दिवशी जेवणाची अडचण भासते; मात्र यावेळी ही अडचण जाणवली नाही. प्रभाग क्रमांक तीनमध्ये मतदानाच्या दिवशी थंडीच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांसाठी आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. हे महाराष्ट्रातील बहुतेक पहिलेच उदाहरण असल्याचे बोलले जात आहे. महिला कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी त्यांना सोयीच्या ठिकाणी नियुक्त्या देण्यात आल्या. पिंक मतदान केंद्रावर सर्व महिला कर्मचारी नियुक्त असून तेथे कामकाज अत्यंत उत्तम पार पडल्याचे दिसून आले. यामागे प्रशासनाचे सुयोग्य नियोजन महत्त्वाचे ठरले. मतमोजणी लांबल्याने प्रशासनावर काहीसा ताण पडला, तरीही संपूर्ण निवडणूक कालावधीत सर्व कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी मच्छिंद्र घोलप, मिलिंद वाघ यांनी किरण सावंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक यंत्रणेची सुयोग्य मांडणी केली. तिन्ही अधिकाऱ्यांना दांडगा अनुभव असल्याने कुठेही अडचण निर्माण झाली नाही तसेच कोणत्याही तक्रारी उद्भवल्या नाहीत, हे विशेष.उद्या मतमोजणी झाल्यानंतर नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत महसूल व नगरपालिका विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी स्वतःला झोकून देत जबाबदारीने काम केल्याने सर्व कामकाज सुरळीत पार पडले. नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांनाही आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य निवडणूक यंत्रणेकडून करण्यात आले. त्यामुळे सर्व उमेदवारांनी किरण सावंत पाटील, मिलिंद वाघ, मच्छिंद्र घोलप तसेच संबंधित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आभार मानले. निवडणूक यंत्रणा हा निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा दुवा असून, तो सुयोग्यरीत्या हाताळण्याचे काम प्रांत अधिकाऱ्यांनी केल्याने त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वाळू माफियांवर 'सर्जिकल स्ट्राईक'

## जप्त वाळू घरकुलासाठी देऊन जपली माणुसकी



**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उत्खननाविरोधात महसूल प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या नेतृत्वाखाली गेल्या पाच दिवसांपासून वाळू माफियांविरोधात धडक कारवाई सुरू असून, या कारवाईत लाखो रुपयांचे साहित्य उद्ध्वस्त करण्यात आले आहे. १५ ते १९ डिसेंबर दरम्यान श्रीरामपूर तहसील कार्यालयाच्या गौण खनिज पथकाने विविध ठिकाणी तपासणी करून कारवाई केली. गोवर्धनपूर परिसरात नदीपात्रातील वाळू उपशासाठी वापरण्यात येणारे चप्पू शोधण्यासाठी नगरपालिकेच्या डिझेल बोटीची मदत घेण्यात आली. १८ व १९ डिसेंबर रोजी करण्यात आलेल्या कारवाईत १० चप्पू तोडून जाळण्यात आले असून, सुमारे अडीच लाख रुपयांचे साहित्य नष्ट करण्यात आले. १६ डिसेंबर रोजी नायगाव येथे ९० ते ९५ ब्रास वाळूचा साठा जप्त करण्यात आला. याठिकाणी वाळू उपशासाठी वापरली जाणारी यारी मशीन, जनरेटर आणि दोन फरांडी जप्त करण्यात आल्या असून, याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे जप्त करण्यात आलेली वाळू गरजू घरकुल लाभार्थ्यांना देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. खिर्डी येथे १५ ब्रास वाळू तीन घरकुल लाभार्थ्यांना, तर वांगी बुद्रुक येथे सहा ब्रास वाळू दोन लाभार्थ्यांना देण्यात आली आहे. नायगाव येथील जप्त वाळू देखील लाभार्थ्यांना वाटपासाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली. या संपूर्ण कारवाईत मंडळाधिकारी प्रशांत ओहोळ, ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवक तसेच नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.



# विविध गुणदर्शन स्पर्धेत पळसखेडे शाळेचे वर्चस्व

**संगमनेर । सलीमखान पठाण**

अहिल्यानगर जिल्हा परिषद आयोजित निमोण केंद्राच्या विविध गुणदर्शन स्पर्धा नुकत्याच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कऱ्हे येथे पार पडल्या. निमोण केंद्रातील १० शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पळसखेडे येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत २३ पैकी २० प्रथम क्रमांकाची व ३ द्वितीय क्रमांकाची बक्षिसे पटकावत निर्विवाद यश संपादन केले.

हस्ताक्षर स्पर्धेत किलबिल गटात द्वितीय क्रमांक परी जालिंदर म्हस्के, बालगटात प्रथम क्रमांक श्रेया ज्ञानेश्वर लहारे, किशोर गटात प्रथम क्रमांक समृद्धी इंद्रभान लहारे, तर कुमारगटात प्रथम क्रमांक दिव्या गोरक्ष म्हस्के यांनी मिळवला. वेशभूषेनुसार सादरीकरण स्पर्धेत किलबिल गटात प्रथम क्रमांक आराध्या रोहिदास वाघ, बालगटात प्रथम क्रमांक कार्तिकी सचिन शिंदे, किशोर गटात प्रथम क्रमांक स्वरा योगेश गोर्डे, तर कुमारगटात प्रथम क्रमांक श्रद्धा बस्तीराम कांडेकर हिने पटकावला.

वक्तृत्व स्पर्धेत किलबिल गटात प्रथम क्रमांक श्रद्धा शरद जोंधळे, बालगटात श्रेया ज्ञानेश्वर लहरे, किशोर गटात ईश्वरी अण्णासाहेब गुंजाळ, तर कुमारगटात अक्षदा दिपक पवार यांनी प्रथम क्रमांक मिळवला. वैयक्तिक गीतगायन स्पर्धेत किलबिल गटात आराध्या अनिल जायभाये, बालगटात जयेश संदीप कांडेकर, किशोर गटात वेदराज पंढरीनाथ गाडेकर, तर कुमारगटात निखिल विजय कांडेकर यांनी प्रथम क्रमांक मिळवला. कथा सादरीकरण स्पर्धेत बालगटात विद्या गोरक्ष म्हस्के, किशोर गटात चैतन्य हरिचंद्र लहरे, तर कुमार गटात अक्षदा दिपक पवार यांनी प्रथम क्रमांक पटकावला. समूह गीतगायन स्पर्धेत मोठ्या गटाने प्रथम तर लहान गटाने द्वितीय क्रमांक मिळवला. सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेतही मोठ्या गटाने प्रथम तर लहान गटाने द्वितीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व लेखणी देऊन गौरविण्यात आले.

बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य पळसखेडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच पालकांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनायक कांडेकर, उपाध्यक्ष संदीप कांडेकर, शिक्षणतज्ज्ञ सदस्य संजय सोनवणे, ग्रामविकास अधिकारी तडवी भाऊसाहेब उपस्थित होते. केंद्रस्तरीय स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक भारत काळे, उपाध्यापक केशव घुगे, संपत दरेकर, सुभाष बुळे, कमल सावंत, सुरेखा आंधळे, अर्चना भालेकर, पल्लवी कांडेकर आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# कावेरीवर थरारक हल्ला; संशयितांचे नावे समोर

**जामखेड । रिजवान शेख**

जामखेडबीड रोडवरील हॉटेल कावेरी येथे बुधवार, ता. १७ डिसेंबर रोजी मध्यरात्री घडलेल्या थरारक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला. सात ते आठ जणांच्या संशयित टोळीने हॉटेलवर धडक देत प्रथम मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली आणि त्यानंतर अंधाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात हॉटेल मालक रोहित पवार (वय २७, रा. कान्होपात्रा नगर, जामखेड) गंभीर जखमी झाले. त्यांच्या पायाला गोळी लागल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला असून त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रोहित पवार हे रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास हॉटेलवर उपस्थित होते. मध्यरात्री सुमारे बारा वाजता संशयित टोळी हॉटेलमध्ये घुसली. त्यांनी टेबल, खुर्च्या, भांडी व इतर साहित्याची तोडफोड केली. त्यानंतर रोहित पवार यांच्यावर थेट गोळीबार करण्यात आला. गोळी त्यांच्या पायाला लागल्याने ते रक्तबंबाळ झाले. हल्ल्यानंतर संशयितांनी रोहित पवार यांची चारचाकी वाहनाचीही तोडफोड केली, त्यामुळे वाहनाचे मोठे नुकसान झाले. हा संपूर्ण प्रकार काही




मिनिटांत घडला असून हॉटेलमधील कर्मचारी व ग्राहक भयभीत होऊन पळून गेले. घटनेची माहिती मिळताच जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय दंड संहिता कलम ३०७ (हत्या करण्याचा प्रयत्न), ४२७ (तोडफोड) तसेच महाराष्ट्र शस्त्र कायदा कलम ३(१)(२) अंतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून त्यामधून दोन संशयितांची नावे निष्पन्न झाली आहेत. तपास सुरू असल्याने त्यांची नावे सध्या जाहीर करण्यात आलेली नाहीत. प्राथमिक तपासात हा हल्ला जुना वाद व वैयक्तिक शत्रुत्वातून झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी अहिल्यानगर येथील फॉरेन्सिक पथक दाखल झाले असून, गावठी कट्ट्याचे अवशेष व काडतुस सापडले आहेत. उर्वरित पाच ते सहा आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत. घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे तसेच जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. जखमीची भेट घेऊन तपासाबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. या घटनेनंतर जामखेडबीड रोड परिसरातील व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# प्रतिबंधित नायलॉन मांजाविरोधात महापालिकेचा कडक इशारा

**अहमदनगर । रयत समाचार**

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंग उडविताना प्रतिबंधित नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या निर्देशानुसार, प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या वापराविरोधात जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत मुख्य स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता निरीक्षकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आयुक्त डांगे यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. प्रतिबंधित नायलॉन मांजामुळे पक्षी, प्राणी तसेच मानवी जीवितास गंभीर धोका निर्माण होतो. अनेकांना गंभीर दुखापती होतात, तर काही घटनांमध्ये मृत्यूदेखील झाल्याचे उदाहरणे आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारचा मांजा वापरू नये, तसेच प्लास्टिकपासून तयार करण्यात आलेले पतंगही टाळावेत, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले. सामाजिक भान राखून नागरिकांनी स्वयंप्रेरणेने पर्यावरणपूरक आणि सुरक्षित पर्यायांचा अवलंब करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. शहरात प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तात्काळ खालील मोबाईल क्रमांकांवर माहिती द्यावी, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहेत ते असे सावेडी परिसर - ८९९९८६६३०९, झेंडीगेट/मुकुंदनगर - ८३७९९०४६६७, बुरुडगाव - ९४२२७२७४६५, केडगाव - ९०११०५२७५५. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, तसेच संबंधित मांजा विक्रेत्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही आयुक्त डांगे यांनी स्पष्ट केले. बैठकीस घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, हरियालीचे सुरेश खामकर, हरिभूमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी, मुख्य स्वच्छता निरीक्षक परिक्षित बिडकर, प्रशांत रामदिन, तुकाराम भांगरे तसेच सर्व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

# रामचंद्र शेटे यांचे निधन

**नेवासा । विजय खंडागळे**



श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थानचे विश्वस्त पोपटराव शेटे यांचे वडील तथा शनिशिंगणापूर येथील प्रगतिशील शेतकरी रामचंद्र दामोदर शेटे यांचे वयाच्या ९०व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी शाखा व्यवस्थापक पोपटराव शेटे पाटील यांचे ते वडील होत, तर दैनिक प्रभातचे शनिशिंगणापूर येथील पत्रकार रवींद्र पोपटराव शेटे यांचे ते आजोबा होत. कै. रामचंद्र शेटे यांना 'भाऊ' या टोपणनावाने शनिशिंगणापूर परिसरात ओळखले जात होते. ते प्रारंभापासून धार्मिक प्रवृत्तीचे, एकनिष्ठ व कष्टकरी शेतकरी होते. त्यांच्या मुलांनी विविध क्षेत्रांत सेवा बजावत कुटुंबाचा नावलौकिक वाढविला आहे. त्यांच्या निधनाने शनिशिंगणापूर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

